# देव-देवपूजा

देवपूजेच्या वैदिक परंपरेचा मागोवा,
देवपूजेचं महत्त्व, पूजेचे प्रकार, षोडशोपचार पूजा आणि
गणेश चतुर्थीचा संक्षिप्त पूजाविधी

लेखन व संकल्पना: गुरुदास



# देव-देवपूजा

संकल्पना व संकलन
**गुरुदास**

सातम उद्योग™
www.satamudyogbooks.com

# अनुक्रम :


१. हृद्गत ! .................................... ३
२. देव-देवपूजनेचा मागोवा .................................... ७
३. प्रार्थना .................................... १३
४. पंचायतन पूजा .................................... १७
५. देवपूजेचे प्रकार .................................... २३
६. देव पूजेचे सोळा उपचार .................................... २७
७. गणेश चतुर्थी : श्रीगणेश पूजनाचा विधी .................................... ३२
८. परंपरागत धार्मिक संकेत .................................... ४६



- **प्रकाशक : हेमंत स. साटम**

- **मुद्रक : साटम उद्योग**
  २०३, अमित इंडस्ट्रियल इस्टेट, लालबाग, मुंबई-४०० ०१२.
  ८१६९९ ८४९२७

- **ई-बुक आवृत्ती**



© **सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन**

# हृद्गत

अलिकडे सणावारांच्या निमित्ताने, विशेषतः चातुर्मासातील सण-उत्सव, खास करुन गौरी-गणपतीच्या दिवसात, अधूनमधून देवपूजेच्या संदर्भात वृत्तपत्र आणि नियतकालिकातून पत्ररुपाने किंवा लेखरुपाने विविध प्रकारच्या प्रतिक्रिया उमटत असतात. विशेष म्हणजे या विषयाशी संबंधित अभ्यासू व अधिकारी व्यक्ती तसेच जाणकार पुरोहित मंडळीही अतिशय जाणीवपूर्वक या विषयावर प्रबोधन करतात. या सर्व मतमतांतरातून एक गोष्ट खचितपणे जाणवते ती ही की, समाजातील जाणत्या, सुबुद्ध, विचारी आणि श्रद्धावान अशा बहुसंख्य सुसंस्कृत व्यक्तींना या विषयाची खूप आस लागलेली आहे. इतकंच नव्हे तर वैदिक धर्म आणि परंपरा जाणून घेण्याची खरीखुरी जिज्ञासा आणि उत्कंठा त्यांच्यात जागी झालेली आहे. आजच्या घडीला हीच मोठी आनंदाची घटना आहे.

५०-१०० वर्षापूर्वीची सर्वसामान्य माणसाची जी आर्थिक स्थिती होती ती आता खूप बदलली आहे. थोडी बहुत सुबत्ता आलेली आहे. अर्थार्जनाचे वेगवेगळे मार्ग खुले झाले आहेत. देहाचे कष्ट कमी करणाऱ्या, श्रम वाचविणाऱ्या अनेक सुखसोयी उपलब्ध झाल्या आहेत. देहसुखाची चलती असणाऱ्या चंगळवादाची अनेक साधनं आज हाकेच्या अंतरावर आहेत. हे सारं सुख सर्वार्थाने आणि सर्वांगाने भोगूनही भोक्ता मात्र समाधानी नाही. तो रोज नवनवीन सुखाच्या शोधात फिरतोच आहे. कारण सारं काही असूनही नसण्याची उदासीनता आहे. प्रपंचासाठी-देहसुखासाठी सारा साज-शिणगार गोळा करुनही हातातून काही तरी मौल्यवान चीजवस्तू गळून जातेय, आपण काही तरी जीवमोलाचं हरवून बसलोय याबद्दलची बोच त्याच्या अंतःकरणाला सतत खोलवर खूपू लागली आहे. शोधायचं तर कुठे, आणि नेमकं काय शोधायचं, हेही कळत नाही, अशी स्थिती आहे.

खरं तर माणूस सर्वकाही मिळवण्याच्या नादात जी एकमेव गोष्ट हरवून बसला आहे ती म्हणजे मनःशांती. समाधान. आनंद ! खरं तर मनःशांती हरवून बसणं, हा शब्दप्रयोगही चुकीचा आहे. कारण वैदिक परंपरा म्हणते की, 'आनंद, शांती,

समाधान हे सारं सुख तर आपल्या अंतःकरणातच आहे. ते बाहेरच्या जगात शोधून मिळणारच नाही. काही पदरमोड करुनही ते मोले घेता येणार नाही. ते सारं मिळवायचं असेल तर फक्त आपली दृष्टी आत वळवायला हवी. शांती-समाधान-आनंद हे सारं काही तिथे अथांग भरलेलं आहे'. पण हे सारं घबाड आपल्या इतकं निकट असूनही आपल्याला त्याची साधी खबर नाही. आपण आपला शोध बाहेरच्या जगातच सुरु ठेवला आहे.

गेल्या शे-दीडशे वर्षाच्या गुलामीत आपल्यावर झालेले पाश्चात्य संस्कार, तेथील ज्ञानविज्ञानाच्या प्रगतीचा आणि भोगवादाचा आपल्या आचार-विचारांवर झालेला परिणाम, शिक्षणाने बुद्धिवादाचा चढलेला नको तेवढा ज्वर यामुळे आपल्या पूर्वसूरींनी जगण्यासाठी जी साधी सोपी प्रपंच-परमार्थाची व्यवस्था करुन ठेवली होती, तिच्या सावलीला आपण दुरावत गेलो आहोत. कुटुंब व्यवस्थेचा जो आडोसा होता तोही आज गळून चालला आहे. अशा स्थितीत आपल्या वाटेला उघड्यावागड्या भकासपणाचा उन्हाळा आला नाही तरच नवल ! मात्र या उन्हाळी झळांनी पोळलेला माणूस आज पुन्हा आपल्या मूळ सावलीला परत येण्याचा विचार करतो आहे, ही साधी गोष्ट नाही. हे परिवर्तन आहे. हे तर सासरहून माघारपणाला आपल्या माहेरी जाण्यासारखं आहे. विशेष म्हणजे ज्या पाश्चात्य संस्कृतीच्या पालख्या आपल्यातल्या अनेक बुद्धिवाद्यांनी स्वतःच्या खांद्यावर अभिमानाने मिरवल्या त्यातील तथाकथित देवही गेल्या काही वर्षात वैदिक परंपरा, वैदिक धर्माकडे वळू लागले आहेत. ही चांगली गोष्ट आहे. त्यांचे स्वागत असो. कारण आपल्या वैदिक धर्माने विचारस्वातंत्र्य, आचारस्वातंत्र्य मान्य केलं आहे. ती तर एक उदार जीवनशैली आहे. तिचे दरवाजे सर्वांना खुले आहेत. तेथील वातावरण खेळतं आहे. म्हणून हजारो वर्षे बहुतांश हिंदु समाज न घुसमटता तिला चिकटून आहे.

आज पुन्हा एकदा नव्या संदर्भात आपले परंपरागत संस्कार जवळ करण्याचा विचार आपण करतोय, ही स्वागताची गोष्ट आहे. ऐहिक सुखाचे उत्सव साजरे करता करता दमून गेलेला आणि भौतिक सुखामागोमाग येणाऱ्या दुःख वेदनांनी व्याकूळ झालेला माणूस आता खऱ्या आनंदासाठी योगविद्या शिकू लागलाय, आर्ट ऑफ लिव्हिंग शिकू लागलाय, आधुनिक संत-महंताच्या मठात किंवा आश्रमात

जाऊ लागलाय. तीर्थयात्रा करु लागलाय. इतकंच काय पण हजारोंच्या संख्येने पंढरपूर-शिर्डी पायवारीही करु लागलाय. ध्यान-धारणा, नामस्मरण यासारख्या साधनांकडेही तो वळू लागला आहे. देवपूजा हीसुद्धा त्याला समजून उमजून करावीशी वाटत आहे. कारणं काहीही असोत, पण हे परिवर्तन म्हणजे आपली आपल्यालाच खूण पटू लागल्याचा शुभशकून आहे.

देव आणि देवपूजेची संकल्पना ही काही आजची नाही. खरं तर ती संकल्पना नव्हेच. ती तर प्रत्यक्ष अनुभवातून परिणत झालेली जीवनधारणा आहे. वेदकाळातील ऋषी-मुनींनी आपल्या द्रष्टेपणातून जो या विश्वाच्या जडणघडणीचा अभ्यास केला त्याची ती फलश्रुती आहे. या संकल्पनेतही काळानुरुप बदल होत गेले आहेत. मूळ तत्व मात्र कायम आहे. बदलले आहे ते फक्त बाह्य स्वरुप. अर्थात कालमानानुसार सर्वसामान्य माणसाला या धारणा सोप्या वाटाव्या या उद्देशानेच हे फेरफार झाले आहेत. थोडक्यात देव आणि देवपूजा ही आपल्या वैदिक परंपरेने संपूर्ण मानव जातीला दिलेली एक अनमोल देणगी आहे. ती केवळ बहुमोल आहे असं नाही, तर ती अतिशय भावपूर्ण आणि ईशसौंदर्याने अलंकारलेली अपार सुंदर भेट आहे. ती सुखमय आहे. शांतीमय आहे. प्रवृत्तीकडून निवृत्तीकडे नेणारी आहे. आपल्या वैदिक परंपरा आणि वैदिक धर्म म्हणजे संपूर्ण सृष्टिचक्राच्या ठायी निरंतर वास करणाऱ्या ईशसौंदर्याच्या कौतुकाचा अतिशय भावमधुर सोहळाच होय. म्हणूनच देव-देवपूजा, सणवार, उत्सव, व्रतवैकल्ये  या विषयांवर आजपावेतो खूप विपुल प्रमाणात लिहिलं गेलंय आणि बोललंही गेलं आहे.

वेदमहर्षी व्यासांनीच वेद-पुराण-भागवतातून इतकं अपार सांगितलं आहे की, आज पावेतो त्यावर असंख्य ज्ञानीजनांनी भाष्य करुनही हा विषय अजून चर्चिलाच जातोय. उपनिषदांनी या विषयाचा मोठा ह्रद्य सोहळा मांडला आहे. भक्तश्रेष्ठ नारदमुनींनी तर आपल्या भक्तीसूत्रात देव आणि देवपूजेची महती कायमची सूत्रबद्ध करुन ठेवली आहे. पूजा ही भक्तीभावाचं मूळ उगम स्थान होय. खुद्द भगवान श्रीकृष्णानेही भगवद्गीतेत या विषयाचं महात्म्य सांगितलं आहे. संतांनी तर या विषयाचं महत्त्व सदासर्वकाळ आपल्या अभंगवाणीतून सर्वसामान्यांसाठी वाहातं ठेवलं आहे. त्यात कुणी भर घालावी अशी स्थिती मुळीच नाही. आणखी काही सांगावं

असंही काही नाही. पण तरीही आजच्या बदलत्या परिस्थितीत आणि बदललेले संदर्भ लक्षात घेऊन पुन्हा एकदा या विषयाला उजाळा देणं, त्याची उजळणी करणं गरजेचं झालं आहे हे नक्की. कारण अलिकडच्या काळात हा विषय सर्वसामान्यांच्या दृष्टीने खूप जिव्हाळ्याचा आणि जिज्ञासेचाही होऊन बसलाय. हा संदर्भ घेऊनच थोडं मागे जाऊन या विषयाचा वेध घेण्याचा व एक सामान्य श्रद्धावान माणूस म्हणून आपलाही एक साधा सोपा विचार पुढे ठेवण्याचा हा एक अल्प-स्वल्प प्रयत्न आहे. त्यातून आजच्या दु:खी, कष्टी, उदास, हताश माणसाला आपल्या वैदिक परंपरांबद्दल आत्मीयता वाटून, त्यांच्या अभ्यासाने व मनन-चिंतनाने थोडीफार मन:शांती लाभावी हाच या एकूण प्रयासामागील सद्हेतू आहे.

देवपूजा काय, नामस्मरण काय, व्रतवैकल्ये काय किंवा सण-उत्सव काय, एकदा त्यांच्या संकल्पनेमागील भूमिका समजावून घेतली की, हे उपक्रम केवळ कर्मकांड नसून आपल्या दु:खी कष्टी जिवाला आंतरिक आनंदाकडे नेणाऱ्या साध्या सोप्या वाटा आहेत हे कळतं. खरं म्हणजे पूजा ही जीव-शिवाला सांधणारी हळुवार नाळ आहे. जिवा-शिवाचा मेळ झाला की, हे उपक्रम आंतरिक सुखाचे उत्सव होऊ शकतात हा अनेकांचा अनुभव आहे. तो सर्वांचा व्हावा हीच भगवच्चरणी प्रार्थना.

□□□